# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 362/२०२०**

**विषय : सन २०२१ च्या सार्वजनिक सुट्टया...**

महाराष्ट्र शासन, अधिसूचना क्रमांक सार्वसु. ११२०/प्र.क्र.८२/कार्या-२९.-परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (सन १८८१ चा अधिनियम २६) कलम २५ करीता जे अधिकार भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांकः ३९/१/६८, जेयूडीएल/तीन, दिनांक ८ मे, १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आल्या आहेत, त्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ डिसेंबर, २०२० च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यात शासकीय कार्यालयांना सन २०२१ साठी खाली नमूद केलेल्या सार्वजनिक सुट्टया जाहीर केल्या आहेत. सदर सार्वजनिक सुट्टया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षकेतर सेवकांना व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थेतील शिक्षकेतर सेवकांना जाहीर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२१ | मंगळवार |
| २. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२१ | शुक्रवार |
| ३. | महाशिवरात्री | ११ मार्च, २०२१ | गुरुवार |
| ४. | होळी (दुसरा दिवस) | २९ मार्च, २०२१ | सोमवार |
| ५. | गुड फ्रायडे | ०२ एप्रिल, २०२१ | शुक्रवार |
| ६. | गुढीपाडवा | १३ एप्रिल, २०२१ | मंगळवार |
| ७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२१ | बुधवार |
| ८. | रामनवमी | २१ एप्रिल, २०२१ | बुधवार |
| ९. | रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल-१) | १३ मे, २०२१ | गुरुवार |
| १०. | बुध्द पौर्णिमा | २६ मे, २०२१ | बुधवार |
| ११. | बकरी ईद (ईद-उल-झुआ) | २१ जुलै, २०२१ | बुधवार |
| १२. | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १६ ऑगस्ट, २०२१ | सोमवार |
| १३. | मोहरम | १९ ऑगस्ट, २०२१ | गुरुवार |
| १४. | गणेश चतुर्थी | १० सप्टेंबर, २०२१ | शुक्रवार |
| १५. | दसरा | १५ ऑक्टोबर, २०२१ | शुक्रवार |
| १६. | ईद-ए-मिलाद | १९ ऑक्टोबर, २०२१ | मंगळवार |
| १७. | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | ०४ नोव्हेंबर, २०२१ | गुरुवार |
| १८. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | ०५ नोव्हेंबर, २०२१ | शुक्रवार |
| १९. | गुरुनानक जयंती | १९ नोव्हेंबर, २०२१ | शुक्रवार |
| २०. | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२१ | शनिवार |

D:\2020\Circular 2020\Annual Holiday Circular & EC Item 2020.docx

शासनाने जाहीर केलेल्या अधिसूचनान्वये पाच सुट्ट्या (क) या शनिवारी तसेच रविवारी आलेल्या आहेत. शासनास पाच दिवसांचा आठवडा त्याचप्रमाणे राज्य शासकीय, निमशासकीय कार्यालये, संघटना, शासनाचे उपक्रम तसेच राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील कार्यालये यांच्यासाठी खालील अतिरिक्त सुट्टी जाहीर केलेली आहे.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १ | भाऊबीज | ०६ नोव्हेंबर, २०२१ | शनिवार |

**टीप :-** १. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे हे ज्या स्थानिक सुट्ट्या जाहीर करतील, त्या स्थानिक सुट्ट्या विद्यापीठ कार्यालयास आणि पुणे जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना देण्यात येतील. तसेच मा.विभागीय आयुक्त, नाशिक व अहमदनगर विभाग यांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या स्थानिक सुट्ट्या नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची उपकेंद्रे, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांसाठी लागू होतील.

२. संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थेतील शिक्षकेतर सेवकांना जाहीर केलेल्या सुट्ट्यांमधील काही सुट्ट्या देता येणे शक्य नसल्यास त्यांना त्या बदल्यात कार्यालयीन सोयीनुसार पर्यायी सुट्टी देय होईल.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७**
**जा.क्र. : एएन/**5L125
**दिनांक :** 30 DEC 2020

***प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-***

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था
५. मा.कुलसचिव, महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठे

यांना विनंती की वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.